॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
खर्च करुन आवक शोधण्यापेक्षा आवक पाहून खर्च करावा.





अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १३ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

# अंदमानमध्ये वेळेआधीच मान्सून दाखल होणार

## ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के.एस.होसाळीकर यांची माहिती

**● पुणे । वीरभूमी–**

मान्सून यंदा वेळेआधीच दाखल होणार असल्याची चिन्ह निर्माण झाली आहे. नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागराच्या काही भागांत आणि अंदमानात आला आहे. तसेच निकोबार बेटांवर मंगळवार दि. १३ मे पर्यंत पोहचण्याची शक्यता आहे.




येत्या चार ते पाच दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, कोमोरिन क्षेत्राच्या काही भागात येणार आहे. ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के.एस.होसाळीकर यांनी याबाबतची माहिती दिली आहे. भारतीय हवामान विभागाने दोन दिवसांपूर्वी केरळमध्ये वेळेच्या चार दिवसांपूर्वी मान्सून येणार असल्याचे म्हटले आहे. २००८ नंतर म्हणजेच १८ वर्षांनी मान्सून नियोजित वेळेच्या चार दिवस आधी केरळमध्ये येणार आहे. सध्या मान्सून दक्षिण अंदमान बेटावर आला आहे.

१५ मे नंतर त्याची प्रगती वेगाने होणार आहे. त्यानंतर तो दक्षिण अरबी समुद्रात प्रवेश करेल आणि श्रीलंकेचा काही भाग, दक्षिण बंगाल उपसागराचा काही भाग, संपूर्ण अंदमान बेट व्यापणार आहे. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची तारीख ३१ मे आहे. परंतु यंदा २७ मे रोजीच मान्सून पोहचणार आहे. गोव्यामध्ये पाच जून तर महाराष्ट्रातील किनारपट्टी भागांत ६ जूनपर्यंत मान्सून येण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. १०६ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. पावसासंदर्भात भारतीय हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज २०१५ वगळता गेल्या २० वर्षांत बरोबर ठरला. यंदा अल निनो किंवा ला निना याबाबत कोणतीही परिस्थिती उद्धवणार नसल्याचे म्हटले आहे.

हवामान विभागाने राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. पुढील तीन-चार दिवसांत राज्यातील अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याचा इशारा दिला आहे. हवामान विभागाकडून पुढील चार दिवस पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असल्याने जळगाव जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# जिल्ह्यात अवकाळी पावसाचा तडाखा

## पाथर्डीत अनेक ठिकाणी नुकसान । शेवगाव, कर्जत, पारनेर, अकोले, श्रीगोंद्यात जोरदार पाऊस

**● नगर । वीरभूमी–**

जिल्हा प्रशानाने दिलेल्या इशाऱ्यानुसार सोमवारी जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. अवकाळी पावसाने पाथर्डी तालुक्यात मोठे नुकसान झाले असून पारनेर, शेवगाव, श्रीगोंदा, अकोले, कर्जत तालुक्यात जोरदार पाऊस झाला आहे. अकोले तालुक्यातील भंडारदरा धरण परिसरात व मुळा धरणाच्या पाणलोटातही जोरदार पाऊस झाल्याने समाधान व्यक्त होत आहे. मात्र फळपिके, चारा पिके यांचे नुकसान झाले असून काही शेतकऱ्यांचा कांदा भिजून नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात १४ मे पर्यंत जोरदार अवकाळी पाऊस होण्याचा इशारा देत यलो अलर्ट देण्यात आला होता. त्यानुसार सोमवारी जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार वादळी पाऊस झाला. या पावसाने सर्वाधिक नुकसान पाथर्डी तालुक्यात झाले असून कोरडगाव परिसरातील आसराच्या नदीला पूर आला होता. पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव, दैत्यनांदूर, सोनोशी, जिरेवाडी आदीसह इतर गावांमध्ये जोरदार पाऊस झाला. यामुळे आसराची नदीला पूर आल्याने कोरडगाव ते बोधेगाव रोडवरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

पारनेर तालुक्याच्या अनेक भागात सोमवारी आवकाळी पावसाने हजेरी लावली. सुपा पारनेर टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ आणि तिखोल या गावांमध्ये जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे ओढे-नाल्यांना पाणी वाहू लागले. या पावसाने साठवणुकीसाठी ठेवलेल्या कांदा पिकाचे नुकसान झाले. तालुक्याच्या उत्तर भागात सध्या पावसाचा जोर वाढला आहे. यापूर्वी मागील आठवड्यात पारनेर तालुक्यातील काही गावात गारपीट होऊन शेतमालाचे नुकसान झाले होते. त्यानंतर पुन्हा सोमवारी पहाटे भिज पाऊस झाला. यामुळे काढणीला आलेल्या आंबा पिकाचे नुकसान झाले आहे.



## श्रीगोंदा तालुक्यात जोरदार पाऊस

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील बहुसंख्य गावात सोमवार दि.१२ रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास मान्सूनपुर्व पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. तालुक्यात सरासरी २३.४ मी.मी पाऊस नोंदवला गेला. या अचानक आलेल्या पावसाने मात्र काढणीसाठी आलेल्या पिकांचे व काढून शेतात टाकलेल्या कांदे झाकण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ झाली.

यावर्षी मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातच मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. रविवारी काही गावात हजेरी लावलेल्या पावसाने सोमवारी पहाटे अचानक तालुकाभर दस्तखत दिली. श्रीगोंदा, काष्टी, मांडवगण, बेलवंडी, पेडगाव, चिंभळा, दैवदैठण, भानगाव व आढळगाव गटात सरासरी दोन दिवसात २३.४ मिमी पावसाची नोंद झाली. या पावसामुळे शेतकरी वर्गाची मात्र धांदल उडाली. शेतात काढून टाकलेला कांदा व साठवणुकीच्या वखारीची अनेक शेतकऱ्यांची कामे प्रलंबित असल्याने कांदा झाकण्यासाठी शेतकरी वर्गाची तारांबळ उडाली.

# अष्टविनायक दर्शनासाठी निघालेल्या श्रीगोंदा बसला अपघात

## ८ प्रवाशी जखमी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा येथे रविवार दि.१२ रोजी पहाटे साडेपाच वाजता श्रीगोंदा आगाराची बस पलटून अपघात घडला. ही बस अष्टविनायक दर्शनासाठी जाणाऱ्या प्रवाशांना वाहून नेणारी होती. बसमध्ये एकूण ४८ महिला, मुले प्रवाशी भाविक होते. अपघातावेळी मान्सूनपूर्व पाऊस येत होता. अपघातात ८ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर श्रीगोंदा येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले.



याबाबत अधिक माहिती अशी की श्रीगोंदा आगाराची बस (एम एच २० जी सी २५४२) अष्टविनायक दर्शनासाठी घोटवी येथून महिला प्रवाशांना घेऊन श्रीगोंदा बसस्थानकाकडे येत होती. तेथून बस अष्टविनायक दर्शनासाठी जाणार होती. पहाटे साडेपाचच्या सुमारास मान्सूनपूर्व पाऊस बरसत असताना मखरवाडी, श्रीगोंदा येथे समोरच्या गाडीने हुलकावणी दिल्याने बस रस्त्यालगत पलटी झाली. या अपघातात एकूण ८ प्रवाशी किरकोळ जखमी झाले. जखमींना तातडीने श्रीगोंदा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. बसमधील उर्वरित ४० प्रवाशी सुदैवाने सुरक्षित राहिले.

घटनेची माहिती मिळताच विभागीय वाहतूक अधीक्षक सी. एस. चौधरी, सयंत्र अभियंता एम. व्ही. कासार आणि आगारप्रमुख संदीप ढवळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पहाटेची वेळ असल्याने जखमींना बस आगाराने खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यावेळी जखमींचा औषधोपचाराचा खर्च व प्रवाशांना अल्प प्रमाणात मदत म्हणून अधिकाऱ्यांनी अर्थसहाय्य केले.

# दहावीच्या बोर्डाचा आज निकाल

**● मुंबई । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल ५ मे रोजी जाहीर झाला होता. त्यानंतर दहावीचा निकाल कधी लागणार याबाबत सर्वांना विद्यार्थी आणि पालकांना उत्सुकता होती. आता त्यांची ही उत्सुकता संपली आहे. दहावीच्या परीक्षाचा निकाल १३ मे रोजी दुपारी एक वाजता जाहीर होणार आहे.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळाकडून दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. आता या परीक्षाचा निकाल जाहीर होणार आहे. १३ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने हा निकाल मिळणार आहे. निकालापूर्वी मंडळाकडून पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे. त्यात निकालाची एकंदरीत माहिती दिली जाणार आहे.



गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये, महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर झाला होता. यंदा दहावी आणि बारावीच्या परीक्षाही लवकर होवून निकालही लवकर लागला आहे.

# आगळीक केल्यास थेट हल्ला : पंतप्रधान मोदींचा इशारा

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

आता दहशतवाद आणि संवाद, दहशतवाद आणि व्यापार सोबत चालणार नाही, तसेच पाणी आणि रक्त सोबत वाहणार नाही. यापुढे पाकिस्तानसोबत चर्चा झाली तर फक्त पाकव्याप्त काश्मीरवर आणि दहशतवादावरच होणार असल्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. यापुढे पाकिस्तानच्या अणवस्त्रांच्या धमकीला घाबरणार नाही. उलट त्यांच्यावर जोरदार कारवाई केली जाईल, असाही इशारा मोदी यांनी दिला. ऑपरेशन सिंदूर फक्त स्थगित करण्यात आले आहे, थांबविलेले नाही. यापुढे पाकिस्तानने दहशतवाद्यांना पाठिंबा देणे थांबविले नाही तर भारत पूर्ण शक्तीने हल्ला करेल, असा सज्जड दम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला दिला.

भारत-पाकच्या लढाईनंतर प्रथमच पंतप्रधान मोदी यांनी देशाला संबोधित केले. यावेळी त्यांनी ज्यांनी आमच्या बहिणींचे कुंकू पुसले, त्याचा बदला भारताने घेतला. ऑपरेशन सिंदूर हे फक्त एक नाव नाही, तर ते देशातील कोट्यवधी लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. ६ मे रोजी रात्री उशिरा आणि ७ मे रोजी पहाटे संपूर्ण जगाने या प्रतिज्ञेचे फलितात रुपांतर पाहिले आहे. भारतीयांच्या बहिणी किंवा मुलींच्या कपाळावरील सिंदूर पुसून टाकण्याचे काय परिणाम होतात, हे आज प्रत्येक दहशतवादी, प्रत्येक अतिरेकी संघटनांनी पाहिले.



आम्ही भारतीय लष्कराला पूर्ण मोकळीक दिली आणि त्यानंतर लष्कराने कारवाई करत पाकिस्तानचे दहशतवादी तळ उद्धवस्त केले. भारताच्या जबरदस्त हल्ल्यानंतर पाकिस्तान जगभर मदतीची याचना करत होता. त्यानंतर १० मे रोजी दुपारी पाकिस्तानच्या डीजीएमओचा शस्त्रसंधीसाठी फोन आला. तोपर्यंत भारतीय लष्कराने त्यांचे काम पूर्ण केले होते, अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी दिली. भारत आता पाकिस्तानसोबत दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीरवरच चर्चा करेल असे ठणकावून सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरची कारवाई फक्त स्थगित केली आहे, पण थांबवली नाही. यापुढे पाकिस्तानने दहशतवाद्यांना पाठिंबा देणे थांबवले नाही, तर भारत पूर्ण शक्तीने हल्ला करणार, असे म्हटले.

भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर जशास तसे उत्तर दिले जाणार हे ऑपरेशन सिंदूरमुळे स्पष्ट झाले. ज्या ठिकाणी दहशतवादी तळ आहेत, ती उद्धवस्त केली जाणार हे या कारवाईने दाखवून दिले आहे. आता दहशतवादी आणि त्यांना पोसणा-यांना वेगळ्या दृष्टीने न पाहता धडक कारवाई केली जाईल, असेही पंतप्रधान म्हणाले. भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे अचूकरित्या उद्धवस्त केले. दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नव्हती की, भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल. जेव्हा राष्ट्र सर्वोच्च असते तेव्हा असे कठोर निर्णय घेतले जातात, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

या लढाईत मेड इन इंडिया शस्त्रांनी पाकिस्तानला आपली ताकद दाखवून दिली. हवाई हल्ले असो वा पर्वतीय प्रदेश, प्रत्येक ठिकाणी भारतीय बनावटीच्या शस्त्रांनी त्याची क्षमता सिद्ध केली. भारताच्या जोरदार हल्ल्यांमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने शस्त्रसंधीची याचना केली. तोपर्यंत भारताने आपले लक्ष्य साध्य केले होते. त्यामुळे आम्ही शस्त्रसंधी केली, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.

### शूर सैन्यांच्या शौर्याला सलाम

● गेल्या काही दिवसांत आपण सर्वांनी देशाची ताकद आणि संयम दोन्ही पाहिले. सर्वप्रथम प्रत्येक भारतीयांच्या वतीने शक्तीशाली भारतीय सैन्य, गुप्तचर संस्था आणि शास्त्रज्ञांना सलाम करतो. ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी आपल्या शूर सैनिकांच्या अफाट शौर्याला सलाम करतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# SPOT NEWS



## भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे बुद्ध जयंती साजरी

● **नगर । वीरभूमी-** भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे भगवान बुद्ध यांची जयंती (पौर्णिमा) उत्सव साजरी करण्यात आली. सिद्धी बाग येथील बुद्ध विहार येथे शहर शाखेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर अध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे समवेत गौतम पाचारणे, लक्ष्मण माघाडे, रवींद्र कांबळे, संतोष कांबळे, संजय डहाणे, रविकांत कांबळे, रतन तुपविहिरे, प्रकाश खंडागळे, सुमित डहाणे, राम गायकवाड, बाबासाहेब डोळस, बाळू बनकर, मयूर गायकवाड, किरण उजागरे, करुणा गायकवाड, शोभा गाडे, माया उजागरे, मंदा भोसले, एकनाथ गायकवाड, सुमेध क्षीरसागर, शिंदे मेजर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी त्रिसरण बुद्ध पूजा पाठ करण्यात आली व भगवान बुद्धांच्या गुणाचे स्मरण करण्यात आले व बौद्धाचार्य दीपक पाटोळे यांनी भगवान बुद्ध यांचे जीवन चरित्र सागुन बुद्ध पूजा पाठ घेतली दुपारी धम्मदेसनेचा कार्यक्रम झाला. अहमदनगर शहर शाखा अध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे म्हणाले की, संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध महासभेच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## महाराणा प्रताप जयंतीनिमित्त राजपूत समाज सेवा संस्थेकडून रक्तदान शिबिर व गुणवंतांचा गौरव

● **नगर । वीरभूमी-** राजपूत समाज सेवा संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने महाराणा प्रताप यांची ४८५ वी जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने संस्थेने शहरात भव्य मोटरसायकल रॅली काढून महाराणा प्रताप यांच्या शौर्याचे स्मरण करत जनजागृती केली. रॅलीदरम्यान देशभक्तिपर गीते आणि जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. नगर-पुणे महामार्गावरील ओम गार्डन येथे पार पडलेल्या अभिवादन सोहळ्यात महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी महाराणांच्या शौर्य, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यप्रियतेच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी नाशिक कारागृह अधीक्षक प्रकाश परदेशी, तोफखाना पोलीस ठाण्याचे स.पो.नि. उज्वलसिंह राजपूत, स.पो.नि. पूनम श्रीवास्तव, स.पो.नि विनोदसिंह अरुणसिंह परदेशी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य व उद्योजक रणजित विजयसिंह परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. या जयंतीनिमित्त समाजात समाजाभिमुख योगदान देण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. सर्व रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक आणि समाजबांधवांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास लहानांपासून मोठ्यांपर्यंत समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

# शेवगावमध्ये रंगणार देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

### प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांची माहिती । स्पर्धेच्या कुस्ती मैदानाच्या मातीचे पूजन

● **शेवगाव । वीरभूमी-** शेवगाव शहरामध्ये बुधवार, दि. २८ मे व २९ मे या दिवशी देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी प्रथमच ४२ किलो, ४८ किलो, ५२ किलो वजन गटाचा समावेश करण्यात आल्याने नवीन कुस्तीपटूंना पर्वणी ठरणार आहे. या स्पर्धेच्या ९ गटामध्ये बक्षिस ठेवण्यात आले असून जास्तीत जास्त कुस्तीपटूंनी व कुस्ती चाहत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



तत्पूर्वी सकाळी या स्पर्धेसाठी आखाड्यातील मातीचे पूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जगदीश धूत व विश्व हिंदू परिषदेचे ज्ञानेश्वर वंजारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, भाजपा प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस नंदू मुंढे, शिवसेनेचे एकनाथ कुसळकर, डॉ. नीरज लांडे, विलास फाटके, उदय मुंढे, कमलेश गांधी, अजय भारस्कर, कडू मगर, दिगंबर काथवटे, अंकुश कुसळकर, अंकुश ढाकणे, पाथर्डी तालीम संघाचे अध्यक्ष पप्पू शिरसाट, डॉ. प्रदीप उगले, सचिन शिरसाठ, नितीन फुंदे, अ‍ॅड. श्याम कनगरे, भूषण देशमुख, सोमनाथ शिंदे, गणेश गर्जे, सागर जाधव, कानिफ साखरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मातीपुजनानंतर स्पर्धेची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत अरुण मुंढे यांनी सांगितले की, या स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. २८ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, राम महाराज झिंजुर्के व रेणुकामाता मल्टिस्टेटचे अध्यक्ष प्रशांत (नाना) भालेराव यांच्या हस्ते होणार आहे. तर या स्पर्धेचे बक्षीस वितरण २९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार असून, यावेळी जीम व कुस्ती संकुलाचे देखील उद्घाटन करण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध मल्लांची निमंत्रित थरारक कुस्ती राहणार आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध दिल्लीचा रुस्तुम हिंद अजय बनवाल यांच्यात दोन लाख रुपयांची बक्षीसावर रंगणारी कुस्ती ही प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात दीड लाख रुपयांची कुस्ती होणार असून, महिला विभागातही जबरदस्त झुंज पाहायला मिळणार आहे. नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती होणार असल्याची माहिती मुंढे यांनी दिली.

तब्बल ५ वर्षांनंतर जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा होत असून, ४२ किलो वजनी गट ते मोठ्या एकूण ९ गटातील मल्लांचा समावेश राहणार आहे. जिल्ह्यातील मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा पर्वणी ठरणार असून, भरीव बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी नामांकित पंच असणार असून त्यांचा निर्णय अंतिम असणार आहे.

या स्पर्धेसाठी खंडोबा मैदान येथे कुस्ती मैदान तयार करण्यात येणार असून दोन हजार प्रेक्षकांना याचा लाभ घेता यावा यासाठी भव्य प्रक्षेक गॅलरी उभारण्यात येणार आहे. शेवगाव तालुक्यात प्रथमच जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा होत असून तालुक्यातील मल्लांसाठी व प्रेक्षकांसाठी ही पर्वणी असणार आहे. यामध्ये जास्तीत जास्त मल्ल व कुस्तीप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन अरुण मुंढे यांनी केले आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख, महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर, नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्या कुस्त्या मुख्य आकर्षण ठरणार आहेत. तसेच जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेतील एक नंबरच्या विजेत्या मल्लास पैलवान स्व. छबू लांडगे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा दिली जाणार असल्याची माहिती जिल्हा तालिम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे यांनी दिली.

## अमेरिकेत होणाऱ्या जागतिक विमा परिषदेसाठी आदित्य कडलग यांची निवड

● **संगमनेर । वीरभूमी-** टाटा एआयए लाईफ इशुरन्स कंपनीचे अभिकर्ता आदित्य सुनील कडलग यांना जागतिक पातळीवरील प्रतिष्ठेचा एमडीआरटी हा सन्मान प्राप्त झाला आहे. हा बहुमान प्राप्त झाल्यामुळे त्यांना ७ ते १० जून २०२६ रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्नियातील अनाहिम येथे होणाऱ्या जागतिक विमा परिषदेत सहभागी होण्याचा सन्मान प्राप्त झाला आहे.



पदार्पणातच २०२३ ला एमडीआरटी, २०२४ ला एकाच वर्षात तीन वेळा एमडीआरटी मानांकन प्राप्त केल्याने जागतिक पातळीवरील प्रतिष्ठेचे सीओटी अवॉर्ड आणि यावर्षी केवळ चारच महिन्यात पहिले एमडीआरटी मानांकन आदित्यने प्राप्त केले आहे.

आदित्य यास एमडीआरटी होण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, प्रेरणादायी वक्ते व कडलग इन्व्हेस्टमेंटचे संस्थापक सुनील कडलग यांच्यापासून प्रेरणा मिळाली. सुनील कडलग हे गेल्या २९ वर्षापासून जीवन विमा सल्लागार, १६ वर्षांपासून म्युच्युअल फंड वितरक व आरोग्य विमा सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. येथील कडलग इन्व्हेस्टमेंटच्या माध्यमातून त्यांनी या क्षेत्रात अतिशय पारदर्शक व प्रामाणिक सेवा व कार्य केले आहे.

जागतिक विमा परिषदेसाठी पात्र होण्यासाठी आदित्य कडलग यास टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स कंपनी नाशिकचे शाखाधिकारी धनंजय पाटील, चीफ बिझनेस असोसिएट सुरज वानखेडे, सामजिक कार्यकर्ते व कडलग इन्व्हेस्टमेंटचे संचालक सुनील कडलग, आई उपक्रमशील शिक्षिका वृषाली कडलग यांचे मार्गदर्शन लाभले. आदित्यच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आयपीपीएस परिक्षेत यश मिळवल्याबद्दल मुस्कान सय्यद हिचा सत्कार

● **अकोले । वीरभूमी-** अकोले शहरातील गरिब मुस्लिम कुटुंबातील मुलगी कु. मुस्कान जाकिर सय्यद हिने नुकत्याच झालेल्या आयपीपीएस परिक्षेत राज्यात ६३ वी रँक मिळवली. तिला टिटवाळा एमएसईबी येथे पोस्टींग मिळाले आहे.



अकोले शहरातील अतिशय गरीब कुटुंबातील मुलगी मुस्कान जाकिर सय्यद ही असुन तिचे वडील जाकिर सय्यद हे गावोगावी बाजारात जाउन साडी विक्री तसेच साबण विक्री करुन आपले कुटुंब चालवत आहे. तर आई गृहिणी असुन दोघेही मुस्कानच्या शिक्षणासाठी मेहनत घेऊन तिला प्रेरणा देत असतात. त्याची मुलगी मुस्कान हि पहिल्यापासून अभ्यासात हुशार व मेहनती आहे. तिने इयत्ता १० वीतही उर्दू शाळेत नंबर मिळवला होता तर ११ वी १२ वी अगस्ती महाविद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे शिक्षण घेताना १२ वीतही चांगले गुण मिळवतना अकाउंट विषयात तिने १०० पैकी १०० गुण मिळवले होते.गेली दोन वर्षापासून मुस्कान सी.ए. चा अभ्यास करत आहे. हा अभ्यास सुरु असतानाच कु मुस्कान हिने, IPPS ही स्पर्धा परिक्षा दिली या परीक्षेत मुस्कान हिने राज्यातील विद्यार्थीमध्ये ६३ वी रँक मिळवली आहे. ही परिक्षा उत्तीर्ण होऊन २४/०३/२०२५ रोजी टिटवाळा येथील एमएसईबी कार्यालयात मुस्कानला पोस्टींग मिळाले आहे. मुस्कानच्या या यशाने तिने आई वडिलांची मेहनत व कष्टाचे यशस्वी फलित केले आहे. तिच्या यशाबद्दल तिचे नातेवाईक, कौटुंबिक स्नेही, अकोले एज्युकेशन सोसायटीचे सर्व विश्वस्त, जमीयत उलमा अकोले सह तालुक्यातून तिचेवर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## पाथर्डीत एकता फाउंडेशनकडून मान्यवरांचा सन्मान

● **पाथर्डी । वीरभूमी-** पुरस्कार व पद व्यक्तीला प्रेरणा देत चांगल्या कामाला प्रोत्साहन देतात, पुरस्कार मिळाल्यामुळे व्यक्तीला गौरव आणि सन्मान मिळतो, ज्यामुळे त्यांना भविष्यात अधिक चांगले काम करण्याचा आत्मविश्वास मिळतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व एकता फाउंडेशनचे संस्थापक अनंत कराड यांनी पाथर्डी येथे केले.



पाथर्डीतील विविध क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त व्यक्ती, विविध पदांवर निवड झालेल्या व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा एकता फाउंडेशन पाथर्डी तालुका शाखेच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता, यावेळी कराड बोलत होते.

यावेळी म.सा.प.चे माजी कोषाध्यक्ष तथा ग्रामीण कथाकार प्रा. डॉ. भास्कर बडे, सचिव गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश प्रवक्ते मल्हारी खेडकर, ज्येष्ठ कवी रूपचंद शिदोरे, एकताचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोठुळे, शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे उपस्थित होते.

यावेळी संत तुकडोजी महाराज आदर्श पत्रकार पुरस्कार अविनाश मंत्री, स्व. दादासाहेब रूपवते सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार हाजी हुमायून आतार, संत तुकडोजी महाराज काव्य भूषण पुरस्कार कवी आत्माराम शेवाळे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष शशिकांत गायकवाड, इ. १२ वी वाणिज्य शाखेत उज्वल यश प्राप्त विद्यार्थीनी मधुरा रामनाथ बंग आदींचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास शिवव्याख्याते सचिन नागपुरे, माजी नगरसेवक रामनाथ बंग, कृष्णा रेपाळ, ह.भ.प. अमोल महाराज सोळसे, सुभाष भागवत, पत्रकार अनिल खाटेर, डॉ. नंदकिशोर औटी, मेजर नवनाथ तरटे, आनंद पंडागळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र उदारे यांनी तर सुभाष भागवत यांनी आभार मानले.

# स्पर्धेच्या युगात चौफेर ज्ञान असणाराच टिकेल

### डॉ. प्रशांतनाना भालेराव । श्रीरेणुकामाता देवस्थान येथे अफरोज जहागिरदार यांचा सत्कार

● **शेवगाव । वीरभूमी-** संगणकीय प्रणालीने जग जवळ आले आहे. कामकाजातील गुणवत्तेसह गतीमानताही वाढत आहे. प्राप्त आणि पर्याप्त संधीचा मागोवा घेतांना चौकर ज्ञानाचे आकलन आत्मसात हवे. चौफेर ज्ञान असणाराच स्पर्धेच्या युगात टिकेल, असे प्रतिपादन श्रीरेणुकामाता मल्टीस्टेटचे संस्थापक, ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव यांनी केले.



श्रीक्षेत्र अमरापूर येथील भूमिपूत्र अफरोज फारुक जहागिरदार पुण्याच्या फर्ग्युसन लॉ कॉलेजमध्ये एल. एल. एमच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असतांना ऑल इंडिया बार कंऊसीलची (AIBC) परीक्षा विशेष गुणवत्तेत उत्तीर्ण झाले. त्यांच्या यशाबद्दल श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्रीरेणुकामाता देवस्थानात बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. भालेराव बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके हे होते. दरम्यान अमरापूर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच आशाताई गरड यांचे हस्तेही जहागिरदार यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. भालेराव म्हणाले, सन्मान हे निमित्त आहे. मिळालेल्या सन्मानातून गुणवंतांना वर्तमानात शाबासकीची शिदोरी उर्जा देणारी ठरते म्हणून येथून पुढे प्रत्येक पौर्णिमेला श्रीरेणुकामाता देवस्थानात विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी डॉ. फारूक जहागीरदार, बाळासाहेब चौधरी, डॉ. अरविंद पोटफोडे, विजय पोटफोडे, श्रीमंत घुले, चंद्रकांत गायकवाड, प्रा. जनार्दन लांडे पाटील, अबरार जहागीरदार आदी उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS



### बहुजन समाज पार्टीच्या वतीने भगवान गौतम बुद्ध यांना अभिवादन

**● नगर । वीरभूमी-**

बहुजन समाज पार्टीच्या वतीने भगवान गौतम बुद्ध यांची जयंती (बुध्द पौर्णिमा) साजरी करण्यात आली. शहराच्या सिध्दीबाग येथील बौध्द विहार मधील गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तर बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहार मुक्तीची केंद्र सरकारकडे मागणी केली. या अभिवादन सोहळ्यासाठी जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव राजू शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, सलीम अत्तार, बाळासाहेब काते, चंद्रकांत दोंदे, संजय संसारे, अशोक तांबे, कैलास कोळगे, कचरू लष्करे, अनिकेत कडू, गणेश बागल, जयसिंग यादव, रवीनंद कुमार, राजेंद्र रामफळे आदींसह बसपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### इंडस्ट्रीज इस्टेटच्या जे.एल.पी. कॉलनीतील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे उद्घाटन



**● नगर । वीरभूमी-**

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री असताना शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणून प्रभाग १५ मधील अनेक अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले. कोट्यावधी रुपयांचे विकास कामे मार्गी लागली असून, प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम करण्यात आले आहे. विकासात्मक कामे मार्गी लावून नागरिकांचे मुलभूत प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात आले. पुन्हा राज्यात महायुतीची सत्ता असल्याने मोठ्या प्रमाणात निधी आणून नागरिकांची प्रलंबीत विकास कामे देखील प्राधान्याने सोडविण्यात येणार असल्याचा विश्वास माजी नगरसेवक अनिल शिंदे यांनी व्यक्त केला. प्रभाग क्रमांक १५ मधील लिंक रोड, इंडस्ट्रीज इस्टेटच्या पाठीमागे असलेल्या जे.एल.पी. कॉलनीतील बहुप्रतीक्षित रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ माजी नगरसेवक अनिल शिंदे यांच्या पुढाकारातून करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक दिलीप सातपुते, दीपक खैरे, दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, उद्योजक राजेंद्र शिंदे, जालिंदर पालवे यांच्यासह कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जे.एल.पी. कॉलनीतील रस्त्याची समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. विशेषतः पावसाळ्यात रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची जाणीव ठेवून माजी नगरसेवक अनिल शिंदे यांनी सातत्याने पाठपुरावा करून तब्बल ४० लाख रुपये खर्चाचे रस्त्याचे कॉंक्रिटीकरण काम मंजूर करून घेतले आहे.

# निंबळक येथील संगीतमय रामकथेचा समारोप

## सप्ताहाच्या पहिल्याच वर्षी हजारो भाविकांचा उदंड प्रतिसाद

**● नगर । वीरभूमी-**

नगर तालुक्यातील निंबळक गावात पार पडलेल्या सात दिवसीय संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सप्ताह सोहळ्याचा समारोप भक्तीमय वातावरणात पार पडला. ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांच्या संगीतमय कीर्तनांनी आणि रामकथेच्या विविध प्रसंगांनी भाविक मंत्रमुग्ध झाले.



या सप्ताहात त्यांनी रामायणातील प्रसंग सादर करताना आई-वडिलांचे महत्त्व, बंधुप्रेम, आणि समाजातील दुर्बलांच्या मदतीचे मोल असे जीवनमूल्ये प्रभावी भाषेत व संगीताच्या माध्यमातून विशद केली. कीर्तनामध्ये त्यांनी शबरीची भक्ती, भरताचा त्याग आणि सीतेची शुद्धता असे हृदयस्पर्शी प्रसंग सादर करून विविध रामायणातील प्रसंगाने भाविकांना मंत्रमुग्ध केले.

हा धार्मिक सोहळा श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सवा, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३६५ व्या वैकुंठगमन दिनानिमित्त आणि वै. लक्ष्मण रंगनाथ काळे, वै. विजयादेवी लक्ष्मण काळे व वै. अजित लक्ष्मण काळे यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्याच्या कार्याध्यक्षा अनिता काळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके यांनी उपस्थित राहून सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी जि.प. सदस्य माधवराव लामखडे, सरपंच प्रियंका लामखडे, उद्योजक अजय लामखडे, आयोजक अनिता काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात महिला भाविकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. रामाच्या अयोध्यागमनाच्या प्रसंगी महिलांनी आनंदात फुगड्यांचे फेर धरून उत्सवाला रंगत आणली.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अनिता काळे यांनी सांगितले की, रामकथेतून जीवनाला दिशा मिळत असते. या कथेतून बोध घेऊन अनेकांचे जीवन सफल झाले आहे. आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी या कथेचे आयोजन केले होते. या सप्ताहाचे हे पहिले वर्ष असून, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून हे दरवर्षी आयोजित केले जाईल. तसेच लवकरच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सप्ताहातील सात दिवस संगीतमय रामकथेसह विविध धार्मिक कार्यक्रम, हरिपाठ, भजन, अभिषेक आणि महाआरती अशा अध्यात्मिक वातावरणाने गावात भक्तीचा महोत्सव अनुभवता आला. महाप्रसादाच्या वितरणाने सप्ताहाचा समारोप करण्यात आला. या भक्तीमय सोहळ्यामुळे पंचक्रोशीत अध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली असून, पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात हा सोहळा साजरा केला जाईल, असा विश्वासही काळे यांनी व्यक्त केला.

## भगवान गौतम बुद्ध जयंती भिंगारमध्ये उत्साहात साजरी

**● नगर । वीरभूमी-**

जगाला करुणा, क्षमा आणि शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची जयंती बुध्द पौर्णिमा भिंगारमधील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पावसाच्या रिमझिम सरीतही, जॉगिंग पार्कमधील भगवान गौतम बुद्ध यांच्या भव्य पुतळ्यास पुष्पवृष्टी करत उपस्थितांनी अभिवादन केले. या प्रसंगी जॉगिंग पार्कमध्ये स्वच्छता अभियानही राबविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व बुद्ध वंदनेने करण्यात आली. यानंतर धम्ममित्र संजय भिंगारदिवे व विकास भिंगारदिवे यांनी त्रिशरण आणि पंचशील घेतले. जयंतीनिमित्त मिठाई वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, दीपक धाडगे, रतनशेठ मेहेत्रे, दीपकराव घोडके, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेशराव वराडे, अभिजीत सपकाळ, सुधीरशेठ कपाळे, संजय भिंगारदिवे, सचिनशेठ चोपडा, विकास भिंगारदिवे, प्रकाश देवळालीकर, अनिल हळगावकर, शशिकांत पवार, राजू कांबळे, सरदारसिंग परदेशी, प्रांजली सपकाळ, सविता परदेशी, ईवान सपकाळ, संतोष लुणिया, सुहास देवराईकर, इंजी. नागेश खुरपे, मुन्ना वागस्कर, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, सिताराम परदेशी, नामदेवराव जावळे, योगेश चौधरी, प्रवीण परदेशी, हेमंत पंधारे, विशाल भामरे आदींसह अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ यांनी म्हणाले की, भगवान बुद्धांनी मानवजातीसाठी करुणा, अहिंसा, क्षमा, शांती, त्याग, सेवा आणि समर्पण यांसारख्या नीतिसूत्रांची शिकवण दिली. धम्माच्या माध्यमातून त्यांनी आदर्श जीवनाचा मार्ग दाखविला असल्याचे सांगितले.

तसेच सचिनशेठ चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेश त्रिमुखे, रमेश वराडे, सुवर्णा महागडे-भिंगारदिवे, विकास भिंगारदिवे यांनी आपल्या मनोगतातून भगवान बुध्दांच्या विचारांची माहिती देत जीवनात धम्म स्वीकारण्याचे आवाहन केले.

## नांदूर मध्यमेश्वर व पालखेड कालव्यांतून कोपरगावातील गावतळे व शेततळे भरुन द्या

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. आशुतोष काळेंची मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी-**

कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावात तीव्र पाणी टंचाई जाणवत असून नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.हि पाणी टंचाई दूर करण्यासाठी नांदूर मध्यमेश्वर जलद कालवा, पालखेड कालवा तसेच डाव्या, उजव्या कालव्यातून गावतळे व शेततळे भरून द्या अशी मागणी करून मतदार संघातील विविध प्रश्न जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. आशुतोष काळे यांनी मांडले. त्यावेळी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांनी याबाबत तातडीने कार्यवाही केली जाईल अशी ग्वाही दिली असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.



अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पंडीत जवाहरलाल नेहरू सभागृहात रविवार (दि.११) रोजी जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हा नियोजन समिती'ची बैठक पार पडली. यावेळी आ. आशुतोष काळे बोलत होते.

यावेळी बोलतांना ते पुढे म्हणाले की, फेब्रुवारी महिन्यापासून उन्हाच्या झळा जाणवत असल्यामुळे कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे या गावातील गावतळे व शेततळे नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यातून व पालखेड कालव्यातून भरून द्यावीत त्यामुळे पावसाळा सुरु होईपर्यंत या गावातील नागरीकांचा व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. तसेच मतदार संघातील विविध प्रश्न मांडताना त्यांनी सांगितले की, कोपरगाव मतदारसंघातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी तातडीने मंत्रालय स्तरावर विशेष बैठक आयोजित करण्यात यावी. जलजीवन प्राधिकरणाने २०११ च्या लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा योजना केल्या असून त्यानंतर बराच मोठा कालावधी उलटला असून वाढलेल्या लोकसंख्येचा विचार करता या पाणी पुरवठा योजनेतून अपेक्षित पाणीपुरवठा होणार नाही. त्यासाठी सुरु असलेल्या जलजीवन योजनेच्या पाणीपुरवठा योजना वाढीव लोकसंख्येनुसार करण्यात याव्यात. जिल्हा नियोजन अंतर्गत कोपरगाव मतदारसंघातील विविध विकासकामांना निधी मिळावा आदी मागण्या आ.आशुतोष काळे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केल्या. त्यावेळी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# नगरच्या निलेश खेडकर यांना 'महाधन योद्धा पुरस्कार'

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

पेडगाव येथील प्रगतशील शेतकरी निलेश खेडकर यांना कांदा पिकामधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'महाधन योद्धा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा गौरव लोकमत सरपंच पुरस्कार सोहळ्यात, लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आला. या कार्यक्रमाला स्थानिक सरपंच, शेतकरी बंधू, तसेच लोकमत आणि महाधन ॲग्रिटेक लिमिटेडचे अधिकारी उपस्थित होते.

हा पुरस्कार महाधन ॲग्रिटेक लिमिटेडतर्फे प्रायोजित करण्यात आला होता. कंपनीकडून पीक-विशिष्ट पोषणद्रव्य उपायांद्वारे शेतीत नावीन्य आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी ही एक महत्त्वाची पायरी आहे.



पुरस्कार स्वीकारतांना श्री. खेडकर म्हणाले, महाधनचं क्रॉपटेक ८:२१:२१ हे खत वापरल्यामुळे माझ्या कांदा पिकामध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आल्या. संपूर्ण उत्पन्नापैकी सुमारे ८५-९०% कांदे ए आणि बी ग्रेडमध्ये आले. तसेच कांद्याचा शेल्फ लाइफ ५-६ महिने वाढला, जे साठवणूक व बाजारातील वेळ साधण्यासाठी फार महत्त्वाचं ठरतं. खतांच्या खर्चात १०-१५% बचत झाली आणि एकूण उत्पादन २०% ने वाढलं. यामुळे माझा नफा वाढला आणि शाश्वत व वैज्ञानिक शेतीच्या दृष्टीने आत्मविश्वासही मिळाला.

महाधन ॲग्रिटेक लिमिटेडचे प्रगत खत 'क्रॉपटेक' हे देशभरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह पर्याय ठरला आहे. त्याच्या खास न्यूट्रिएंट अनलॉक टेक्नॉलॉजीमुळे, शेतीतील उत्पादन वाढवण्यासोबतच खत खर्चही कमी करण्यात मदत होते.

श्री. नरेश देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाधन ॲग्रिटेक लिमिटेड, यांनी सांगितले की, श्री. निलेश खेडकर यांच्यासारख्या शेतकऱ्यांना बळ देणे हीच आमची खरी कामगिरी आहे. महाधनमध्ये आम्ही नेहमीच आधुनिक, पीक-केंद्रित खत उपायांद्वारे शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करत असतो. आमचं उद्दिष्ट म्हणजे शेतीत उत्पादकता, नफा आणि शाश्वतता वाढविणं.

महाधन योद्धा पुरस्कार हा वैज्ञानिक दृष्टिकोनातून शेती करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांच्या सन्मानाचे प्रतीक आहे आणि महाराष्ट्रभर अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या महाधनच्या कार्याला अधोरेखित करतो.

### महाधन ॲग्रिटेक लिमिटेड विषयी

■ महाधन अॅदग्रिटेक लिमिटेड ही दीपक फर्टिलायझर्स ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडची १००% सहाय्यक कंपनी असून, नाविन्यपूर्ण शेती उपायांची अग्रेसर कंपनी आहे. शेतकऱ्यांना प्रगत उत्पादने आणि तंत्रज्ञानाद्वारे सक्षम करत, कंपनी उत्पादनक्षमता वाढवणे आणि शाश्वत शेतीसाठी प्रयत्नशील आहे. भविष्यातील समृद्ध व टिकाऊ शेतीसाठी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हेच कंपनीचे ध्येय आहे.

## श्रीतिलोकमध्ये ३० वर्षांनी भरला वर्गमित्रांचा मेळा

**● पाथर्डी । वीरभूमी-**

तीस वर्षांनी जुने वर्गमित्र भेटले, ही एक अविस्मरणीय आणि भावनिक अनुभव होता. अनेक वर्षांच्या कालावधीनंतर, मित्र पुन्हा एकदा एकत्र आले आणि त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. ३० वर्षांपूर्वीचे दिवस, शाळेतील गदारोळ, मैत्रीचे क्षण आणि एकमेकांना मदत करण्याची भावना आठवत होती. तीच मौज मस्ती करत मित्रांनी एकमेकांना ओळखले आणि त्यांच्या जीवनातील बदल, यश, आणि आव्हाने एकमेकांना सांगितले.



जुने मित्र नवीन रूपात दिसले, पण त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि प्रेम अजूनही कायम होते. या भेटीने प्रत्येकजण खूप भावनिक झाला. जुन्या आठवणींनी त्यांना खूप आनंद दिला. या भेटीने त्यांच्या मैत्रीची जोडणी अधिक दृढ झाली. तीस वर्षांनी भेटलेले वर्गमित्र एक अविस्मरणीय अनुभव होता. या भेटीने त्यांच्या मैत्रीचे महत्त्व आणि त्यांच्या जीवनातील आनंद अधिक वाढला. कारण ठरले पाथर्डी शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयात १९९६ च्या १० वी बॅच चा स्नेहसंमेलन. हे स्नेहसंमेलन तालुक्यातील आतापर्यंतचे सर्वात मोठे वर्गमित्रांचे स्नेहमिलन ठरले. यासाठी सुमारे १५० माजी विद्यार्थी व त्यावेळचे सुमारे २५ शिक्षक उपस्थित होते. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी मिळून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

यावेळी संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांच्यासह सर्व विश्वस्त, प्राचार्य अशोक दौंड, जेष्ठ निवृत्त शिक्षक सुभाषलाल खाबिया, थोरात मॅडम यांच्यासह २४ माजी शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या. हा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश सानप,महेश बाहेती, भारत भडके, संजय शेटे, तात्यासाहेब करडभाजे, संदीप बडे, अरविंद खेडकर, हरिभाऊ वायकर, महेश इजारे, सारिका उरणकर, नीता आव्हाड, दिप्ती बाहेती, रेखा डाळींबकर यांनी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे नियोजन महेश सानप, जेवण व्यवस्था पंकज मुनोत, सत्कार अरविंद खेडकर, स्वागत रघुनाथ शिवणकर अमोल टकले यांनी तर व्यवस्था डॉ. लोखंडे विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हरीभाऊ वायकर आणि नीता आव्हाड यांनी केले. प्रस्तावना महेश बाहेती, स्वागत भारत भडके, सारिका उरणकर यांनी केले तर संजय शेटे यांनी आभार मानले.

# शिर्डी, अहिल्यानगर येथे स्पर्धा परिक्षा अभ्यासिका सुरु करणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील | जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक

**● नगर | वीरभूमी–**

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा विनियोग सामान्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडेल अशा पद्धतीने नावीन्यपूर्ण योजनांची अंमलबजावणी करा. योजना राबविताना जिल्ह्याच्या मानवी विकास निर्देशकांबाबतही जिल्हा प्रशसानाने आढावा घ्यावा. घरकुल योजनांसाठी गायरान जमीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यासाठी शिर्डी आणि अहिल्यानगर येथे अभ्यासिका सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस खासदार भाऊसाहेब वाकचौरे, विधान परिषदेचे सदस्य किशोर दराडे, सत्यजित तांबे, आमदार मोनिका राजळे, डॉ. किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रम पाचपुते, आमदार अमोल खताळ, आमदार हेमंत ओगले, प्रधान सचिव तथा जिल्ह्याचे पालकसचिव प्रविण दराडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, समाजकल्याणचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, राजुर आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) व अनुसूचित जाती व आदिवासी उपयोजनेंतर्गत १ हजार २१ कोटी ८५ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी मार्च अखेरपर्यंत ९३२ कोटी ३८ लक्ष म्हणजेच ९९.९४ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी ७०२ कोटी ८९ लक्ष रुपयांची शासनाने आर्थिक मर्यादा कळविली होती. राज्यस्तरावर झालेल्या बैठकीत केलेले सादरीकरण व लोकप्रतिनिधींनी केलेली वाढीव मागणी विचारात घेता ८२० कोटी रुपयांचा नियतव्यय शासनाने मंजूर केला असल्याचेही पालकमंत्री ना. विखे पाटील यांनी सांगितले.

चालू आर्थिक वर्षात विद्यूत विकासासाठी ५० कोटी रुपये, अपारंपरिक ऊर्जा विकासासाठी ४५ कोटी रुपये, लघूपाटबंधारे, कोल्हापुरी बंधारे बांधकाम व दुरुस्तीसाठी ३२ कोटी ८२ लाख, रस्ते विकासासाठी



१०९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदानासाठी २५ कोटी रुपये, मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदानासाठी २५ कोटी, नगर विकासासाठी ७६ कोटी रुपये, यात्रास्थळांच्या विकासासाठी १० कोटी रुपये व पर्यटन स्थळांच्या विकासासाठी ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी १९१ कोटी ९२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून रोजगार निर्मिती व जिल्ह्याचे सकल उत्पादन वाढीसाठी कृषी, उर्जा विकास व पर्यटन क्षेत्राशी संलग्न प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मागील तीन वर्षात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध विकास कामांवर खर्च करण्यात आलेल्या निधीतून झालेल्या विकासाचा मानव विकास निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास करुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्याचा मानव निर्देशांक उंचावण्यासाठी सर्व विभागांनी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. जिल्ह्याच्या विविध विकास कामांबाबत मंत्रलयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची सूची तयार करुन सादर करावी. जिल्ह्याच्या पालकसचिवांच्या समन्वयातून प्रस्तावांचा पाठपुरावा करुन तो मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या योजनांची एकत्रित माहिती असलेली अद्यावत माहिती सर्वसामान्यांना मिळावी, यासाठी जिल्ह्याची विकास योजनांची पुस्तिका प्रकाशित करण्यात यावी. जिल्ह्यात जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची कामे शीघ्रगतीने पूर्ण करावीत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांच्या उभारणीसाठी ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नसेल अशा ठिकाणी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त समितीने गायरान जमीनीची पाहणी करुन ती घरकुलासाठी उपलब्ध करून द्यावी. मानवी आरोग्यासाठी घातक असलेल्या गुटखा विक्रेत्यांवर तसेच पनीर निर्मितीमध्ये भेसळ करणाऱ्यांची अन्न व औषध विभागामार्फत तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधून पाण्याचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून पाणीटंचाईच्या प्रश्नावर गांर्भीर्याने काम करावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० व्या जयंतीनिमित्त चौंडीसाठी कुकडी आवर्तनातून पुरेशा प्रमाणात पाणी सोडण्यात येणार आहे. ३१ मे पर्यंत चौंडी येथील तलाव पूणपणे भरलेले असतील. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अहिल्यानगर व शिर्डी येथे जिल्हा नियोजन निधीतून अभ्यासिका सुरु करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. बैठकीस सर्व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### पालखी नियोजनांसाठी विशेष बैठक

■ आषाढी वारीसाठी जिल्ह्यातून २२१ पालख्या जातात. या पालखांच्या नियोजनाबाबत जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू करावी. यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येणार असून, संत निवृतीनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात प्रथम होते. त्यामुळे या पालखीच्या नियोजनाबबात विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी अधिकऱ्यांना दिले.

# छत्रपती शिवराय यांच्या विचारातून मोदी सरकारचे कार्य

## आ. शरद सोनवणे | शंकरजी गायकर यांच्या नर्मदा परिक्रमेचा यशस्वी सांगता सोहळा

**अकोले | वीरभूमी–**

छत्रपती शिवरायांच्या हिंदुत्ववादी ◌चारातून देशाचे पंतप्रधान मोदीजी ◌ाम करत आहेत. यामागे शंकरजी ◌ायकरांसारखे अनेक हिंदुत्ववादी ◌ार्यकर्त्यांचे कार्य दडलेले आहे असे ◌ौरवोद्गार जुन्नर तालुक्याचे आमदार ◌रददादा सोनवणे यांनी काढले.

ब्राम्हणवाडा येथे विश्वहिंदू परिषदेचे ◌द्रीय सहमंत्री व राष्ट्रीय प्रवक्ते शंकर ◌ाऊराव गायकर यांनी द्वितीय नर्मदा ◌ाता पायी परिक्रमा यशस्वीरित्या ◌र्ण केली. या पवित्र कार्याच्या ◌ांगतेनिमित्त भव्य व भक्तिमय ◌ोहळ्याचे आयोजन करण्यात आले ◌ोते. यावेळी महामंडलेश्वर बाळानंद ◌हाराज कोंडार, अकोलेचे माजी ◌ामदार वैभवराव पिचड, संगमनेरचे ◌ामदार मा. अमोल खताळ यांच्या ◌त्नी सौ. नीलमताई खताळ, श्रीक्षेत्र ◌ावशक्ती गड, तुळजवाडी ह.भ.प. ◌ंतोषानंद महाराज, पंचगंगा उद्योग ◌मूहाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे, ◌ाजपा जिल्हा अध्यक्ष नितीनजी ◌ंनकर, सितारामजी भांगरे, ◌ाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा परिषद गटनेते जालिंदर वाकचौरे, मोहित ढमाले, संगमनेरचे उपविभागीय अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, भाजपा मंडल अध्यक्ष राहुल देशमुख, वाल्मिक नवले, बाळासाहेब सावंत, माजी उपसरपंच भारत आरोटे, ॲड. के. बी. हांडे, गोकुळ आरोटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सचिन आरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



आ. सोनवणे म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी तोरणा किल्ला घेतला त्यावेळेस मोगल सत्ता त्यांना हसत होत्या परंतु स्वराज्य घडवलं आणि औरंगजेबाला याच मातीत गाडलं तसंच कार्य अटलजी आडवाणी यांनी रथयात्रा काढली त्यावेळेस ७० टक्के देश त्यांना हसत होता मात्र त्या वेळी दिलेले आश्वासन मोदीजींनी पूर्ण केली भव्य राम मंदिर उभारले ३७० कलम हटवले यासाठी अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी आपले जीवाचे बलिदान दिले अशीच प्रेरणा शंकरजी गायकर यांनी आपल्या आयुष्यात जपली असे गौरवोद्गार काढले.

माजी आ. वैभव पिचड यांनी पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी मोदीजींनी सिंदूर ऑपरेशन केले. धर्म विचारून मारणारे दहशतवादी आहेत. आज हिंदुत्व विचार पसरत आहे यामागे शंकरजी गायकरांसारखे अनेक व्यक्तिमत्त्वांचा त्याग आहे. सौ.निलमताई खताळ या बोलताना म्हटल्या की, विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आम्ही देव आणि धर्म वाचविण्यासाठी मतदान करा अशी विनंती केली आणि हा मुद्दा मतदारांना भावला एक आदर्श शक्ती जीवनात पाठीमागे असते अशी नेहमी वाटत होत ती आदर्श शक्ती आज समोर आली. संगमनेर मध्ये हिंदुत्वाचे मुद्द्यासाठी काम करण्याची गोळी त्यांनी दिली

स्वागत पांडुरंग गायकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रदिप भाटे यांनी तर आभार बाळासाहेब गायकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथर्व गायकर, किरण गायकर यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाची सुरुवात नर्मदा जलपूजनाने व श्री हनुमंतराय अभिषेकाने झाली. कन्यापूजनाचा दिव्य व मंत्रमुग्ध करणारा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिभावाने भरलेला होता. भाविकांच्या मनात अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कारांची प्रेरणा जागवणारा हा सोहळा अनेकांच्या स्मरणात कायमचा कोरला गेला.

# मोहटादेवी देवस्थानच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**● पाथर्डी | वीरभूमी–**

देवस्थानच्या उत्सव कालावधीतील गर्दीचे नियत्रंण व सुलभ व्यवस्थापनासाठी तसेच आपत्कालीन येणाऱ्या संकटांशी मुकाबला करण्यासाठी देवस्थानचे सर्व कर्मचारी, अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण शिबीर नुकतेच संपन्न झाले.



देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सदरचे प्रशिक्षण विभागीय आयुक्त कार्यालय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक डॉ. अतुल पारगावकर यांनी विविध प्रात्यक्षिकासह दिले. त्यामध्ये अग्नीशमन सेवा, वीजेपासुन होणारे अपघात, नैसर्गीक आपत्तीमुळे नुकसान होवू नये, यासाठी करावयाची तयारी, रुग्णांची हृदयक्रीया बंद पडल्यास करावयाचे प्रथमोपचार, इमारतीतील भाविकांचा बचाव कसा करावा याचे प्रशिक्षण आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील तरतुदी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कर्मचाऱ्यांकडुन विविध प्रात्यक्षिकेही करून घेण्यात आली. याच दिवशी बंगळुरू येथील व्यक्तीमत्व विकास समुपदेश श्रीमती लिमा बर्नाड वीजी यांनी देवस्थानास भेट देणारया भाविकांप्रती कर्मचाऱ्यांचा संवाद, सेवाभाव, संवाद कौशल्य तसेच जीवनातील आनंद या विषयावर प्रात्यक्षिकाव्दारे मार्गदर्शन केले.

यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश महेश लोणे, विश्वस्त डॉ. श्रीधर देशमुख यांनी कर्मचाऱ्यांनी भावीकांप्रती संवेदनशील व विनम्र वर्तणुकीबाबत व देवस्थानचा नावलौकीक कसा वाढविण्यात येईल असे मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी प्रशिक्षकाचे स्वागत केले. यावेळी कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण शिबीराप्रती मनोगत व्यक्त करून सदर प्रशिक्षणाचा देवस्थानच्या सेवेत व जीवनामध्ये निश्चीत लाभ होईल असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक अमोल दहिफळे व अमोल गायकवाड, सुत्रसंचालन प्रा. माधव लाड यांनी तर आभार अशोक दहिफळे यांनी मानले.

# नवलेवाडी शाळेच्या शिक्षिकेला पालकांकडून स्कुटी भेट

**अकोले | वीरभूमी–**

नवलेवाडी येथील जिल्हा ◌रिषदेच्या प्राथमिक शाळेच्या ◌शिक्षिका सुमन गणपत खतोडे ◌ांचा गुणगौरव सोहळा पालकांनी ◌ायोजित केला. त्यामध्ये विद्यार्थी ◌ पालक यांनी शिक्षिकेला स्कुटी ◌ोटारसायकलं भेट दिली आहे.



अकोले येथे आयोजित ◌ार्यक्रमात आमदार डॉ. किरण ◌हामटे यांचे हस्ते व राजूर ◌हाविद्यालयाचे माजी प्राचार्य ◌ैलास नवले यांच्या अध्यक्षतेखाली ◌ला होता. यावेळी प्रमुख पाहुणे ◌हणून ॲड. के. डी. धुमाळ, ◌टशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, ◌शिक्षण विस्तार अधिकारी माधवराव ◌ासे, शिक्षण विस्तार अधिकारी ◌ाळासाहेब दोरगे, केंद्रप्रमुख सुनील ◌रसाळे, शिक्षक विक्रम गायकर ◌ांच्या उपस्थितीत इयत्ता चौथीचे सर्व विद्यार्थी व पालक आणि शिक्षक वृंद नवलेवाडी यांनी या गौरव सोहळ्याचे आयोजन केले.

नवलेवाडी शाळेत चौथीच्या विध्यार्थ्यांच्या शिक्षिका सुमन गणपत खतोडे यांच्या शिकवण्याच्या अनोख्या पद्धतीने व विद्यार्थ्यांना आपलेसे करण्याने तसेच त्यांनी केलेल्या अथक परिश्रमाने व मेहनतीने इयत्ता चौथीतील सर्व मुलांनी जिल्हास्तर व राज्यस्तरावर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये नाविन्यपूर्ण यश मिळविले. अनेक विद्यार्थी यशाचे मानकरी ठरले त्यामुळे सर्व पालकांनी त्यांना ज्युपिटर स्कूटी भेट दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता सहाणे यांनी केले तर सत्कारमूर्तींचे परिचय ओळख कविता आरोटे यांनी केले. तसेच आलेल्या पाहुण्यांचा सत्कार डॉ. निलेश सहाणे यांनी केला तर शिक्षक महेश शेटे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सचिन वाकचौरे, सचिन पापळ, अमोल वाकचौरे, संतोष कडलग या पालकांनी सहकार्य केले.

# संजीवनीच्या सहा अभियंत्यांना आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीत नोकरी

**● कोपरगाव | वीरभूमी–**

संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाच्या प्रयत्नाने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवुन देण्यासाठी या विभागाने आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले होते. यात कंपनीने इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या सहा अभियंत्यांची आकर्षक पगारावर नोकरीसाठी निवड केली आहे. टी अँड पी विभागाच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांच्या हातात त्यांच्या अंतिम नोकरीचे नेमणुक पत्र प्राप्त झाले आहे, अशी माहिती संजीवनी पॉलीटेक्निकने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स या गृहोपयोगी उपकरणाच उत्पादन करणाऱ्या कंपनीने नोकरीसाठी निवड केलेल्या नवोदित अभियंत्यांमध्ये गायत्री धर्मेंद्र देवरे, साक्षी शशिकांत, संतोश कुमार, गोरक्षनाथ ज्ञानेश्वर इपर, प्रतिक संजय गायकवाड व शाम कुमार यांचा समावेश आहे.

सध्या तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. नामांकित कंपन्या उत्पादन प्रक्रियेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा व मशिनरींचा उपयोग करतात. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये अभियंत्यांना कोणते तंत्रज्ञान अभिप्रेत आहे, याचा अभ्यास करून त्या तंत्रज्ञानावर अधिकचा भर देवुन ते विद्यार्थ्यांना शिकवून न त्यावर लेखी व तोंडी चाचणी घेवुन विद्यार्थ्यांना परीपूर्ण केल्या जाते. तसेच टी अँड पी विभागाकडून कंपनी निहाय मुलाखतींचा सराव करून घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थी वेगवेगळ्या कंपन्यांच्या मुलाखतींना सहज सामोरे जातात व यशस्वीही होतात.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांनी सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. तर मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार केला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर व टी अँड पी विभाग प्रमुख प्रा. आय. के. सय्यद उपस्थित होते.